चैत्राची सोनेरी पहाट,
नव्या स्वप्नाची नवी पहाट,
नवा आरभ नवा विश्वास,
नव्या वर्षाची हीच तर खरी सुरुवात...

www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

गुढी पाडवा व हिंदू नववर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा....!
–संपादक

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८७ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.९ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

### मोदींनी महाराष्ट्रातील प्रचाराचे नारळ फोडले

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेला उसळला लाखोंचा जनसागर

## कमिशन द्या नाहीतर काम बंद, मविआवर टीका

**चंद्रपूर । प्रतिनिधी– सोमवारी मोरवा येथे चंद्रपूर लोकसभेचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार व गडचिरोली लोकसभेचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचाराचे नारळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चंद्रपूरातून फोडले . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभेच्या सुरूवातीलाच महाराष्ट्रातील महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, इंडिया आघाडीवाले राज्यात वेगवेगळ्या क्लृपत्या लढवून सत्तेत आले तेव्हा त्यांनी फक्त स्वत:चा विकास केला. स्वत:च्या कुटुंबाचा विकास केला. कुणाचा किती वाटा असेल, कुणाला कोणतं कंत्राट मिळेल, मलाईदार पोस्ट कुणाच्या खात्यात आणि किती येणार या हिशोबातच यांनी पूर्ण महाराष्ट्राचं भविष्य गुरफटून टाकलं होतं. महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित प्रोजेक्ट पाहिल्यावर हे म्हणायचे की, कमिशन आणा नाहीतर काम बंद करा. या लोकांनी जलयुक्त शिवार योजना बंद केली. बळीराजा जलसिंजवनी योजना बंद केली. विदर्भ आणि मराठवाड्यात सिंचनासाठी योजना होती ती योजनाही त्यांनी ठप्प केली होती, असे म्हणत मोदींनी जोरदार हल्लाबोल केला.**









### गुढीपाडव्याच्या मराठीतून शुभेच्छा

उद्यापासून गुढीपाडवा नवं पर्व सुरु होतं आहे. सगळ्या बंधू भगिनींना गुढीपाडव्याच्या आणि नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. अश्या शुभेच्छा नरेंद्र मोदी यांनी मराठीतून दिल्याने यावेळी मोदी जिंदाबाद चे नारे देत जल्लोष साजरा केला.

चंद्रपुरात उन्हाचा पारा वाढत आहे, तसंच राजकीय वातावरणही तापतं आहे. मात्र तुमचा जोश, उत्साह अजिबात कमी झालेला नाही. या वेळी चंद्रपूरने ठरवलं आहे फिर एक बार ४०० पारचा नाराही त्यांनी बोलून दाखविला.

पुढे बोलतांना ते म्हणाले ठाकरे सरकारने महाराष्ट्रातली सत्ताही मिळवली तेव्हाही त्यांनी स्वतःचा आणि कुटुंबांचा विकास केला. कोणाचा किती हिस्सा कुठला ठेका कुणाला, मलाईदार खाती कुणाला द्यायची याचमध्ये महाराष्ट्राचा विकास त्यांनी पणाला लावला. महाराष्ट्राच्या विकासाचा प्रकल्प आला की कमिशन हे मागायचे. या लोकांनी जलयुक्त शिवार योजना बंद केली. बळीराजा जलसिंचन योजना ठप्प केली. विदर्भाच्या विकासासाठी जो समृद्धी महामार्ग सुरु केला त्याचाही विरोध केला. कोकणात रिफायनरी प्रकल्पही रोखला. मुंबई मेट्रोचं कामही त्यांनी रोखलं होतं. गरीबांना घरं देणंही बंद केलं होतं. कमिशन द्या नाहीतर कामात खोडा घाला हेच यांचं लक्ष्य होतं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आपण वेगाने काम करतो आहोत. नियत चांगली असली की निकालही चांगले लागतात हे आपण पाहतोच आहोत असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी चंद्रपूरच्या सभेत म्हणाले आहेत.

पंतप्रधान मोदी पुढे बोलताना म्हणाले की २०२४ लोकसभा निवडणूक हा स्थैर्य आणि अस्थिरता यांच्यातला लढा आहे. एकीकडे भाजपा आणि एनडीए आहे. भाजपा आणि एनडीए देशासाठी महत्त्वाचे निर्णय घेते आहे. दुसरीकडे आहे काँग्रेस आणि त्यांची इंडी आघाडी. सत्ता भोगा आणि मलाई खा हे त्यांचं ध्येय आहे. एक स्थिर सरकार किती आवश्यक असतं हे महाराष्ट्राशिवाय आणखी कुणाला जास्त समजणार. जोपर्यंत देशात त्यांचं सरकार होतं, महाराष्ट्राची उपेक्षाच होत राहिली असा आरोप नरेंद्र मोदींनी केला. यावेळी महाविकास आघाडी आणि उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली.राम मंदिराच्या निर्मितीसाठी चंद्रपूर ने लाकडं पाठवली. संसदेच्या नव्या इमारतीतही चंद्रपूरचीच लाकडं आहेत असाही उल्लेख यावेळी त्यांनी केला.

### काँग्रेसला मत म्हणजे विनाशाला मत – मुनगंटीवार

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, आपण सर्वजण नवा संकल्प करू. या देशातील कोणत्याही राजकीय पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांना देखील माहिती आहे की, देशात पुन्हा नरेंद्र मोदी हेच निवडून येणार आहे. त्यामुळे काँग्रेसला मत म्हणजे विनाशाला, गुंडागर्दी, हुकुमशाही व विनाशाला मत आहे. असा हल्लाबोल देखील मुनगंटीवार यांनी केला.

### बाळासाहेबांचे विचार शिंदेंनी पुढे चालवले – नरेंद्र मोदी

काश्मीरी पंडीतांचे घरे जाळले जात होते, तेव्हा बाळासाहेब ठाकरे पुढे आले. तेव्हा त्यांनी असे म्हटले नाही की, काश्मीरमध्ये घडले मग महाराष्ट्रात का बोलायचे. मला अभिमान आहे की, एकनाथ शिंदे व त्यांची पार्टी बाळासाहेबांच्या विचारांना पुढे घेऊन चालली आहे. काँग्रेससोबत सद्या नकली शिवसेना आहे, असे म्हणत नरेंद्र मोदी यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील विदर्भातील महायुतीचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार, गडचिरोलीचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची चंद्रपूरात सभा पार पडली. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माजी केंद्रीय गृह राज्य मंत्री हंसराज अहिर यांची उपस्थिती होती.

मी कुठल्याही शाही घराण्यातून आलेलो नाही. तुम्हीच मला इथवर आणलं आहेत. ज्या लोकांकडे घरं नव्हती असे लोक दलित, वंचित, आदिवासी होते. त्यांच्याकडे पिण्याचं पाणी नव्हतं. रस्ते, शिक्षण, सोयी सुविधा नव्हत्या. त्यामुळे मोदींनी गॅरंटी दिली होती की आमचं सरकार दलित, आदिवासी आणि मागास कुटुंबाचं आयुष्य बदलण्यासाठी काम करणार. आम्ही ते काम करुन दाखवलं, खूप मेहनत घेतली आणि चार कोटी लोकांना घरं मिळवून दिली, हे सगळे याच वर्गांमधले लोक आहेत. उज्ज्वला सिलिंडर योजना मिळालेलेही लोक हेच आहेत असंही नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसला काही सवाल विचारत जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की, देशाचं विभाजन कुणी केलं? काश्मीरचा प्रश्न कुणी प्रलंबित ठेवला? आतंकवाद कुणामुळे निर्माण झाला? बाबासाहेबांना भारतरत्न पुरस्कारापासून वंचित कोण ठेवलं?. आमचं सरकार सत्तेत आल्यानंतर महाराष्ट्रातच नाही तर देशभरात नक्षलवाद कमजोर पडला आहे. गडचिरोली आता पोलादाचं शहर म्हणून ओळखला जातं. कडू कारलं साखरात घोळा किंवा तुपात तळा, ते कडूच राहणार, अशी काँग्रेसची अवस्था आहे. ते कधीच सुधरू शकत नाही.निवडणुकीपर्यंत घर घर जाऊन सांगा की, नरेंद्र मोदी चंद्रपूरात आले होते त्यांना सांगा की, नरेंद्र मोदी यांनी प्रणाम केला आहे. माझा निरोप लोकांपर्यंत पोहोचवा.



### १० वर्षांत मोदींनी अफाट कामे केली – मुख्यमंत्री शिंदे

देशात नवचैतन्य निर्माण करण्याचे काम नरेंद्र मोदी यांनी केले आहे. काँग्रेसच्या पन्नास वर्षांच्या काळात जेवढी कामे झाली नाही. तेवढी कामे १० वर्षात नरेंद्र मोदी यांनी केले आहेत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.शिंदे म्हणाले की, काँग्रेसने जाहीरनामा प्रसिद्ध केला परंतु त्यांनी जाहीरनाम्याऐवजी माफीनामा प्रसिद्ध केला पाहिजे, असा हल्लाबोल एकनाथ शिंदे यांनी केला.

## शिवाजी पार्कवर आज मनसेचा गुढीपाडवा मेळावा

**मुंबई–**शिवाजी पार्कवर आज मनसेचा गुढीपाडवा मेळावा पार पडणार आहे. आगामी लोकसभा निवडणूका आणि मनसेचा गुढीपाडवा मेळावा, असा योग जुळून आला आहे. त्यामुळे मनसे अध्यक्ष राज ठाकरे आज काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष आहे. या सभेसाठी कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

या सभेसाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. सभेत विदर्भ, मराठवाडा, कोकण, नाशिक, मुंबईचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. त्यानुसार, शिवाजी पार्कच्या मैदानात मंचावर नेते आणि पदाधिकारी यांच्यासाठी ३०, तर लोकांसाठी मैदानात सुमारे ७० हजार खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय संध्याकाळी साडेसातच्या सुमारास राज ठाकरे यांचे भाषण सुरू होणार आहे. मात्र तत्पूर्वी पक्षाच्या पाच ते सहा प्रमुख नेत्यांची भाषणे होणार असल्याची माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली.दरम्यान, यासाठी पोलिस बंदोबस्तात देखील मोठी वाढ करण्यात आली आहे. आज ३५ पोलिस अधिकारी सुरक्षेसाठी शिवाजी पार्क मैदानात तैनात असणार आहे. शिवाय गर्दीचे नियोजन करण्यासाठी एक विशेष पथक असणार आहे. मनसे कार्यकर्त्यांना शिवाजी पार्कमध्ये येण्यास कुठलाही त्रास होऊ नये, म्हणून मनसेचे १०० सुरक्षा रक्षक असणार आहेत. ते वाहतुकीसाठी मदत करणार आहेत. तर सभेच्या ठिकाणी ५०० स्वयंसेवक आणि १०० वॉर्डन सुद्धा उपस्थित राहणार आहेत.गेल्या



काही दिवसांपासून मनसे महायुतीमध्ये सामील होणार असल्याच्या चर्चांना वेग आला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्यानंतर तर या चर्चांनी जोर धरला. त्यावर गुढीपाडव्याच्या सभेत मी सर्व काही स्पष्ट करणार असे राज ठाकरे म्हणाले होते. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सोमवारीच राज ठाकरे आमच्यासोबत येतील. हिंदुत्वाच्या भूमिकेमुळे आमची जवळीक वाढली आहे असे म्हंटले आहे. त्यामुळे एकूणच आजच्या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले असून येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज ठाकरे यांची भूमिका नेमकी काय असणार आहे हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## महादेव जानकरांना शिट्टी चिन्ह मिळालं परभणीत शिट्टी तड मशाल अशी लढत रंगणार

**मुंबई–**परभणी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार तथा राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांना निवडणूक आयोगाने शिट्टी चिन्ह बहाल केले आहे. त्यामुळे परभणीत मशाल विरुद्ध शिट्टी अशी लढत होणार आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे विद्यमान खासदार बंडू जाधव यांचा पराभव करण्यासाठी महायुतीकडून महादेव जानकर यांना उमेदवारी देण्यात आली. परंतु जानकर यांनी महायुतीतील मोठ्या मित्रपक्षांच्या चिन्हावर निवडणूक लढणार नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे अजित पवार यांच्या कोट्यातून 'रासप'ला परभणीची जागा सोडण्यात आली. परंतु रासपला चिन्ह नसल्याने त्यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे मागणी करण्यात आली होती. तर आज त्यांना शिट्टी चिन्ह देण्यात आले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महादेव जानकर यांनी निवडणूक आयोगाकडे तीन चिन्हांचा पर्याय दिला होता. या चिन्हांमध्ये पहिल्या पसंतीचं चिन्ह म्हणून शिट्टी चिन्ह मागितलं होतं. तर दुसऱ्या पसंतीच्या चिन्हासाठी सफरचंद या चिन्हाची आणि तिसऱ्या पसंतीचं चिन्ह म्हणून रोड रोलच चिन्ह मागितलं होतं. यानंतर निवडणूक आयोगाने जानकर यांच्या पहिल्या पसंतीचं चिन्ह मान्य केलं आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश



आंबेडकर यांना निवडणूक आयोगाकडून चिन्हाचं वाटप करण्यात आलं आहे. प्रकाश आंबेडकर यांना 'प्रेशर कुकर' हे चिन्हं देण्यात आलं आहे. प्रकाश आंबेडकर हे स्वत: अकोल्यातून निवडणूक लढवत आहेत. ते वंचितचे उमेदवार आहेत. त्यांना निवडणूक आयोगाकडून 'प्रेशर कुकर' चिन्हं देण्यात आलं आहे. त्यामुळे त्यांना प्रेशर कुकर या चिन्हावर निवडणूक लढवावी लागणार आहे. प्रकाश आंबेडकर यांचा अकोल्यात भाजपच्या अनुप धोत्रे यांच्याविरोधात सामना होणार आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे डॉ. अभय पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे या मतदारसंघात तिरंगी लढत होणार आहे.

शिवसेना ठाकरे गटाला निवडणूक आयोगाने दिलेले मशाल चिन्ह हे तात्पुरत्या स्वरूपात होतं. सर्वोच्च न्यायालयाने हे तात्पुरत्या स्वरूपात दिलेले चिन्ह पुढच्या आदेशापर्यंत ठाकरे यांना दिलं आहे. हे चिन्ह ठाकरे यांच्याकडून काढून घेण्यासाठी आम्ही पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत असं समता पार्टीचे अध्यक्ष उदय मंडल यांनी म्हटलं आहे.

## चंद्रपूर गारपीटीची शक्यता

**पुणे–**राज्यात उन्हाचा चटका असह्य होत असतानाच वादळी पावसाला पोषक हवामान झाले आहे. आज विदर्भ, मराठवाड्यात गारपीटीची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यामध्ये प्रामुख्याने चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये गारपीटीचा अंदाज आहे. तर धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिकसह अनेक जिल्ह्यांत वादळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.


मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये काही आज पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदमगर, सोलापूर, नांदेड, लातूर, उस्मानाबाद या भागात हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.

# अशोक परांजपेः पट्टीचे मराठी गीतकार!

**मूळ सांगली जिल्ह्यातील हरीपूरचे असलेले अशोकजी परांजपे यांनी केतकीच्या बनी तिथे नाचला गं मोर, अवघे गरजे पंढरपूर, कैवल्याच्या चांदण्याला, नाविका रे वारा वाहे रे, ही आणि इतरही अनेक प्रसिद्ध मराठी गाणी लिहिली. त्यांच्या स्मृतिंविषयीची श्री. एन. कृष्णकुमार से.नि.अध्यापक यांच्या शब्दांत ज्ञानवर्धक माहिती... संपादक.**

अशोक गणेश परांजपे हे पट्टीचे मराठी गीतकार होते. ते मुंबई येथे महाराष्ट्र राज्य लोककला संचालनालयाचे संचालक होते. त्यानंतर ते औरंगाबादला स्थायिक झाले होते. त्यांनी भक्तिगीत, भावगीत, अंगाईगीत, लावणी, गण-गवळण आणि नाट्यगीत या प्रकारची गीते लिहिली. इंडियन नॅशनल थिएटर- आयएनटी रिसर्च सेंटरचे त्यांचे काम सुरू असताना त्यांनी महाराष्ट्रातल्या खेड्यांमध्ये जाऊन तेथील लोक कलावंतांच्या लोककलेच्या ध्वनिफिती तयार केल्या. त्या संदर्भात परांजपेंनी सन १९९२मध्ये पंढरपूर भक्तिसंगीत महोत्सव आणि १९८६मध्ये आनंदवन येथील महाराष्ट्र आदिवासी कला महोत्सव, असे दोन महोत्सव आयोजित केले. या कामाची नोंद फोर्ड फाउंडेशनने घेतली. ऑस्ट्रियातील इन्स्टिटयूट ऑफ व्हिडिओग्राफी- आयओव्ही या आंतरराष्ट्रीय लोककला संस्थेने त्यांना सभासदत्व दिले. त्यानंतर त्यांनी अनेक मराठी कलावंतांना फ्रान्स, आयर्लंड, जपान आदी देशांत नेऊन तेथे त्यांना कला सादर करण्याची संधी मिळवून दिली.

अशोक गणेश परांजपे हे महाराष्ट्रातील लोककला संशोधक, गीतकार, नाटककार म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म दि.३० मार्च १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील हरिपूर येथे झाला. त्यांचे वडील गणेश परांजपे हे आयुर्वेदाचार्य होते. हरिपूर ही भूमी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या नावाने ओळखली जाते. त्यांचे ग्रामसंस्कृतीशी अतूट नाते होते. शालेय जीवनापासूनच त्यांना सांगली परिसरातील लोककलांचे विलक्षण आकर्षण वाटू लागले. शाहीर आनंदराव सूर्यवंशी, शाहीर बापूराव विभूते, तमाशा कलावंत शंकर तात्या सावजळकर, काळू-बाळू अशा



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

लोककलावंतांशी त्यांचा सततचा संपर्क होता. शाहिरी, सोंगी भारुड दत्तपंथी भजन, तमाशा, तलवार, दांडपट्टा, करपल्लवी या लोककला सांगली परिसरात लोकप्रिय होत्या. त्या सगळ्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. लेखन, वाचन, चित्रकारी सोबतच कुस्तीची त्यांना आवड होती. मुंबईत आल्यावर जे.जे.स्कुल ऑफ आर्टमध्ये त्यांनी चित्रकलेचे धडे घेतले.

दि.१० ऑक्टोबर १९७८ रोजी इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्राची स्थापना वगसम्राट दादू इंदुरीकर यांच्या हस्ते झाली. या संशोधन केंद्राचे संचालक म्हणून अशोकजींनी जबाबदारी स्वीकारली. तसेच ही जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पारही पाडली. सन १९८६ साली इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्रातर्फे आनंदवन वरोरा येथे आदिवासी महोत्सवाचे आयोजन त्यांच्या संकल्पनेतून झाले होते. ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी या आदिवासी महोत्सवाचे मार्गदर्शक होते. दामू झवेरी, कपिला वात्सायन, दुर्गा भागवत आदी मान्यवर या महोत्सवाला उपस्थित होते. सन १९९२मध्ये पंढरपूर येथे भक्तीसंगीत महोत्सवाचे आयोजन त्यांच्याच संयोजनाने झाले होते. फ्रान्स, आयलंड, जपान आदी देशांत महाराष्ट्रातील लोककलांची पथके नेवून तेथे मार्गदर्शन केले. खंडोबाचे जागरण, देवीचा गोंधळ, कोकणातील दशावतार, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या कला, पारंपरिक तमाशा, कीर्तन, लळीत अशा लोककलांच्या जतन, संवर्धन आणि संशोधनासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्यांनी आयएनटीच्या लोक प्रायोज्य कलेच्या संशोधन विभागाचे संचालक असताना कार्य केले. आयएनटीतर्फे ग्रामीण भागातील लोककला आणि लोककलावंतांना नागर रंगमंच उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. तमाशा अभ्यासक रुस्तुम अचलखांब, शाहीर बापूराव विभूते, गोंधळमहर्षी राजारामबापू कदम, चित्रकथी बाहुलेकार गणपत मसगे, परशुराम गंगावणे, पारंपरिक वाद्ये शंकरराव जाधव धामणीकर, दशावतारी कलावंत बाबी नालंग अशा अनेक लोककलावंतांचे कार्यक्रम त्यांनी मुंबईत छबिलदास सभागृहात आयोजित केले. त्यानिमित्त त्या लोककला प्रकारांवर माहितीपूर्ण पुस्तिका प्रसिद्ध केल्या. खंडोबाचे जागरण, लळीत, दशावतार, वासुदेवांची गाणी, नमन खेळे, मादळ यांसारख्या आदिवासी कला यावर अभ्यासपूर्ण पुस्तिका त्यांच्या संकल्पनेतून आयएनटीने प्रसिद्ध केल्या. खंडोबाचं लगीन, दशावतारी राजा, जांभूळाख्यान, वासुदेव सांगती, अरे रे संसार, मातीचं स्वप्न अशा आयएनटी संशोधन केंद्राच्या संशोधन नाट्यांची मूळ संकल्पना आणि लेखन मार्गदर्शन परांजपे यांचे होते. महाराष्ट्रात लोककलांच्या संशोधनाची नवी परंपरा निर्माण करून तरुण अभ्यासकांची फळी महाराष्ट्रभर उभी करण्याचे श्रेय त्यांना जाते. प्रकाश खांडगे, तुलसी बेहेरे, रमेश कुबल, गणेश हाके, सुरेश चव्हाण, पंढरीनाथ काळे, सुरेश चिखले, रामचंद्र वरक अशा तरुण अभ्यासकांची फळी त्यांनी निर्माण केली. त्यांना त्यांचा अभ्यास विषय असलेल्या लोककलांमध्ये मार्गदर्शन केले.

अशोकजी परांजपे यांचे मराठी रंगभूमीवरील योगदान नाटककार म्हणून उल्लेखनीय आहे. संत कान्होपात्रा, संत गोरा कुंभार, अबक दुबक, बुद्ध इथे हरला आहे, आतून कीर्तन वरून तमाशा, दार उघड बया सारखी संगीत रंगभूमीचे वैभव वाढविणारी नाटके त्यांनी लिहिली. नाटकांसोबतच वर्तमानपत्रात त्यांनी स्तंभ लेखन केले. अनोळखी पाऊले ही त्यांची स्तंभलेखन मालिका अतिशय प्रसिद्ध होती. लोककलांचे संशोधन, नाट्यलेखन या सोबतच ते गीतकार म्हणूनही लोकप्रिय होते. अवघे गर्जे पंढरपूर, आला आला सुगंध मातीचा, एकदाच यावे सखया, कुणी निंदावे वा वंदावे, केतकीच्या बनी तिथे, दारी उभी अशी मी, दीनांचा कैवारी, नाम आहे आदी अंती, नाविका रे, पाखरा जा दूर देशी, पैलतीरी रानामाजी, वाट इथे स्वप्नातील संपली जणू, आला आला सुगंध मातीचा अशी अनेक लोकप्रिय गीते त्यांनी लिहिली. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. लोककला संशोधनाच्या क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. अशोकजी परांजपेंनी दि.९ एप्रिल २००९ रोजी त्यांच्या औरंगाबाद येथील निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली.

!! त्यांच्या अविस्मरणीय अनेक स्मृतींना विनम्र अभिवादन !!

# उपमुख्यमंत्री फडणवीस महाराष्ट्राच्या राजकारणातील 'आधुनिक चाणक्य'

महाराष्ट्राच्या राजकारणातील हुकमी एक्का म्हणजेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अर्धशतकापेक्षा जास्त काळ गाजविणाऱ्या व राज्याचे मुख्यमंत्रीपद व केंद्रीय कृषिमंत्री पद सांभाळणाऱ्या शरद पवार यांना थेट आव्हान देण्याचे आव्हानात्मक धाडस केवळ देवेंद्र फडणवीसच करू शकतात. त्यामुळे राज्यातील राजकारणामध्ये सध्या त्यांन ' आधुनिक चाणक्य ' असे म्हटले जात आहे. भारतीय जनता पक्षामध्ये विविध पक्षातील नेत्यांना आणण्याची किमया देवेंद्र फडणवीस करत असल्यामुळे भारतीय जनता पक्षाचा जनाधार व्यापक पद्धतीने पसरविण्याचे काम महाराष्ट्रात वेगाने झाले आहे. पक्षांमध्ये जुन्या व नव्या नेत्यांना अतिशय चांगल्या पद्धतीने हाताळण्याची किमया त्यांनी केलेली आहे. त्यांच्यावर केंद्रीय नेतृत्वाचा विश्वास आहे . विशेषतः देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी व देशाचे गृहमंत्री अमितभाई शहा, पक्षाध्यक्ष नड्डाजी यांचा राजकीय विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुत्सद्दी राजकारणामुळे व विरोधकावर टाकलेल्या डावामुळे सार्थ करून दाखविला आहे. महाराष्ट्रात मागील दीड वर्षांपूर्वी झालेले सत्तांतर हा त्यांच्या मुत्सद्दी राजकारणाचा परिपाक असल्याचे बोलले जाते. शिवसेना पक्षांमध्ये उभी फूट पाडून ते त्यांचे ४० पेक्षा जास्त आमदार फोडण्याचे काम त्यांनी अतिशय धूर्त पद्धतीने केले. त्याबरोबरच राष्ट्रवादी पक्षामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आमदारांचा गट फोडून शरद



पवार यांच्या राजकारणाला सुरुंग लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे शरद पवार, उद्धव ठाकरे हताश झाले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेमध्ये बोटावर मोजण्याइतके आमदार उरले. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटातील अनेक शिवसेनेचे नेते शिंदे गटांमध्ये पक्षांतर करत असल्यामुळे शिवसेना खिळखिळी होत आहे. महाराष्ट्र मध्ये महायुतीचा राज्यकारभार यशस्वीपणे करण्याची किमया देवेंद्र फडणवीस अतिशय चांगल्या पद्धतीने करत आहेत. त्यांची प्रशासनावर पकड मजबूत असल्यामुळे आयएएस अधिकारी सुद्धा त्यांच्यासमोर कोणतीही फाईल ठेवताना अत्यंत अभ्यासपूर्वक पद्धतीने ठेवतात असे मंत्रालयात बोलले जाते. मंत्रालयात आमदारांच्या विविध विकास कामाच्या प्रलंबित फाईली योग्य पद्धतीने तपासून कामे मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना मदत करण्याच्या दृष्टीने, वेगवान व पारदर्शक प्रशासन करण्यासाठी उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे त्यामुळे त्यांना राजकारणातील 'आधुनिक चाणक्य ' म्हटले जात आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ मुंबई व कोकण या सगळ्याच प्रादेशिक भागांमध्ये भाजपाची पाळेमुळे, संघटनात्मक विस्तार, ग्रामीण भागापर्यंत विस्तारण्यासाठी व पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी विविध पक्षातील नेत्यांना भाजपामध्ये आणून त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकून भाजपाचे संघटनात्मक काम मजबूत करण्यासाठी त्यांनी विविध नवीन योजना आखलेल्या असल्यामुळे पक्षाचा बेस महाराष्ट्रात मजबूत होत आहे. महाराष्ट्रात ४८ पैकी ४५ खासदार देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली निवडून आणण्याची जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या ताकदीवर स्वीकारलेली असल्यामुळे ही लोकसभा निवडणूक त्यांच्यासाठी गेम चेंजर ठरणारी आहे.

## सांगली लोकसभा मतदारसंघाचा निर्णय दिल्लीत

## आम्हालाच निर्णयाची प्रतीक्षा-बाळासाहेब थोरात

**मुंबई**-राज्यातील सांगली, भिवंडी आणि मुंबईतील एका लोकसभा मतदारसंघाबाबत काँग्रेस पक्षाच्या वतीने दिल्लीतील वरिष्ठ नेते निर्णय घेणार आहेत. आम्ही या जागे संदर्भात आग्रही आहोत. असे दिल्लीतील नेत्यांना कळविले आहे. आता आम्ही त्यांच्या निर्णयांची प्रतीक्षा करत असल्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी सांगितले आहे. एका जागेच्या बदल्यात दुसरी जागा देणे या संदर्भात विषय राहिलेला नाही. सर्व जागेच्या संदर्भात आता चर्चा जवळपास संपली असल्याचे बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

सांगली लोकसभा मतदार संघावरुन महाविकास आघाडीमध्ये चांगलाच वाद सुरू आहे. यात संजय राऊत यांनी आक्रमक भूमिका घेत काँग्रेसला थेट इशारा दिला आहे. तरी देखील काँग्रेस नेत्यांनी अद्याप माघार घेतली नाही. आम्ही अजूनही सांगलीच्या जागेसाठी ठाम असल्याचे बाळासाहेब थोरात यांनी सांगितले आहे. या संदर्भातील निर्णय हा दिल्लीती वरीष्ठ नेते घेत असल्याचेही ते म्हणाले.पृथ्वीराज चव्हाण यांच्या संदर्भात लोकसभा निवडणूक लढवण्याची चर्चा सुरू आहे. मात्र, काँग्रेसच्या वतीने लढण्याची त्यांची तयारी असल्याचे बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. पृथ्वीराज चव्हाण हे सातारा लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवणार असल्याची चर्चा काही दिवसांपासून सुरू आहे. सातारा लोकसभा मतदारसंघातून त्यांनी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुतारीचे चिन्हावर निवडणूक लढवावी, अशी पवार गटाची इच्छा आहे. त्यासाठी पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांची भेटही घेतली आहे. मात्र, या संदर्भात बाळासाहेब थोरात यांनी भूमिका स्पष्ट केली. पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याची तयारी दाखवली असल्याचे, देखील बाळासाहेब थोरात यांनी सांगितले.

# 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है ?' नांदेडच्या मतदारांचा आमदार अमित देशमुख यांना प्रतिप्रश्न

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर गुरुद्वारा मैदानावर आयोजित केलेल्या सभेमध्ये माजी मंत्री व लातूरचे आमदार अमित देशमुख यांनी नांदेडच्या नेतृत्वावर चौफेर टीका केली होती. त्यांनी या जाहीर सभेमध्ये म्हटले की

' मला नांदेडला प्रचार करण्यासाठी यावे लागेल असे कधी वाटले नव्हते. परंतु ' तुमने पुकारा और हम चलें आये '. यावेळी २०२४ ची लोकसभेची निवडणुक सामान्य माणसांनी हातात घेतली आहे. आणि सामान्य माणूस एखादी निवडणूक हातात जेंव्हा घेतो, तेंव्हा धनशक्तीचा निश्चित पराभव होतो. नांदेड येथील सामान्य मतदार महाविकास आघाडीच्या पाठीमागे खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे निश्चितच मराठवाड्यांवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकेल असा विश्वास त्यांनी या जाहीर सभेमध्ये व्यक्त केला होता. नांदेड आणि लातूर यांचे पिढ्यांपिढ्यांचे नाते आहे. कै. शंकरराव चव्हाण यांनी कै. विलासराव देशमुख यांना घडविले हा इतिहास आहे. थोडक्यात म्हणजे नांदेडने लातूरला घडविले असे सांगत अमित देशमुख यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. कालच्या काँग्रेसच्या प्रचार सभेमध्ये नांदेड जिल्ह्यातील ज्या राजकीय कार्यकर्त्यांचे राजकीय भविष्य माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी घडविले, त्यांनी अशोकराव यांना टार्गेट केले. काँग्रेसचे नेते आमदार अमित देशमुख हे अशोकराव चव्हाण यांच्यावर राजकीय टीका करतील हे अपेक्षितच होते. परंतु अशोकराव चव्हाण यांच्याकडे नजर





रोखून बोलण्याचे धाडस नसलेल्या अनेक जणांनी त्यांच्यावर शाब्दिक प्रहार केले. अशोकराव चव्हाण यांच्याकडून राजकारणातील बाराखडी गिरवणार्यांनीच आपल्या गुरूला टार्गेट करून प्रचार सभेमध्ये सडकून टीका केली हा विषय नांदेडमध्ये चर्चेचा बनला आहे. या प्रचार सभेमध्ये भाजपाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यापेक्षा खा. अशोकराव चव्हाण यांच्यावरच काँग्रेसच्या मंडळीचा रोष अधिक दिसून आला. अशोकराव चव्हाण यांचा नामोल्लेख न करता 'अशोकाच्या पानगळती नंतर वसंत ऋतुची बहार येते.' असे त्यांनी नमूद करताच उपस्थित त्यांनी चांगलीच दाद दिली.

मराठवाडा ही क्रांतिकारकांची भूमी आहे. मराठवाड्यातील जनतेने विशेषतः नांदेड मधील क्रांतिकारकांनी मुघल, औरंगजेब निजामाविरुद्ध संघर्ष करून लढण्याची गौरवशाली परंपरा आजही अबाधित ठेवल्याचे त्यांनी गौरवाने सांगितले. या वाक्याचा रोख नेमका कोणाकडे होता याबद्दलही नांदेडमध्ये राजकीय चर्चा या निमित्ताने चालू झाली आहे. महाराष्ट्रात हुकूमशाही पद्धतीने राज्यकारभार केला जात असून विरोधकांना संपविण्याचे काम राज्यकर्ते करत असल्याचाही त्यांनी आरोप केला. या जाहीर सभेला आमदार अमित देशमुख वगळता काँग्रेसचा प्रदेश स्तरावरचा एकही नेता उपस्थित नव्हता परंतु कोणताही मोठा नेता उपस्थित नसल्याची उणीव आ.अमित देशमुख यांनी भरून काढली.स्व. विलासराव देशमुख यांच्या खास भाषणशैलीची आठवण यावेळी आमदार अमित देशमुख यांच्या भाषणाच्या निमित्ताने नांदेडकरांना आली. स्व. विलासराव देशमुख यांनीच प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नेतृत्व घडविल्याचे व त्यांना ताकद देण्याचे काम केले होते बहुधा याची आठवण त्यांच्या पुत्राला झाली नाही. अशीही चर्चा ही सभा पार पडल्यानंतर नांदेडमध्ये झाली. लातूर लोकसभा मतदारसंघांमध्ये २०१९ च्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार निवडून आल्यानंतर लातूर जिल्ह्यात भाजपाची ताकद कमालीची वाढलेली आहे. अलीकडेच लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्नुषा अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तसेच उमरग्याचे माजी आमदार बसवराज पाटील यांनीही भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे या मतदारसंघांमध्ये भाजपाच्या विजयाची घोडदौड याही वेळी यशस्वी मानली जात आहे. लातूरकडे लक्ष द्यायचे सोडून आमदार अमित देशमुख यांनी नांदेड लोकसभेमध्ये लक्ष कोणत्या कारणावरून घातले आहे. हे सर्वांनाच ठाऊक आहे. मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है ? ' या शब्दांमध्ये नांदेडच्या मतदारांनी आमदार अमित देशमुख यांना प्रतिप्रश्न या निमित्ताने केला आहे.अशोकराव चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस संपुष्टात आली असे म्हणणाऱ्यांना कालच्या नांदेड मधील गर्दीने चांगलीच चपराक दिली आहे. हजारोंचा जनसमुदाय उस्फूर्त काँग्रेसचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांच्या उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपस्थित होता. भाजपाला ही लढत सुरुवातीला सोपी वाटत होती परंतु काँग्रेसच्या रॅलीमधील गर्दीचा उच्चांक पाहता निश्चितच ही लढत तुल्यबळ होणार आहे असे राजकीय संकेत मिळत आहेत. कालच्या काँग्रेसच्या रॅलीमध्ये सर्वसामान्य नागरिक व ग्रामीण भागातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मराठी माणसाच्या रक्ताचे ठसे उद्धव ठाकरेंच्या हातालाही लागलेय-भाजपा अध्यक्ष आशिष शेलार

## जोगेश्वरी विधानसभेवर भाजपाचा झेंडा फडकविणार गटनेते आ. प्रविण दरेकरांनी व्यक्त केला विश्वास

**मुंबई (वृत्तसंस्था)**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठी माणसाच्या छातीवर काँग्रेसच्या सरकारने गोळ्या घातल्या. त्या काँग्रेससोबत उद्धव ठाकरेंच्या पक्षाने हातमिळवणी केली. मराठी माणसाच्या खुणाच्या रक्ताने रंगलेला काँग्रेसचा हात उद्धव ठाकरेंनी हातात मिळवला आहे याचा अर्थ संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मराठी माणसाच्या रक्ताचे ठसे उद्धव ठाकरेंच्या हातालाही लागलेय अशी खरमरीत टीका भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी केली. तर आगामी निवडणुकीत जोगेश्वरी विधानसभेवर भाजपाचा झेंडा फडकविणार असल्याचा विश्वास गटनेते प्रविण दरेकर यांनी व्यक्त केला.





जोगेश्वरी-पूर्व येथील मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रविण मर्गज, विधानसभा अध्यक्ष बाबुभाई पिल्ले, दिगंबर मांजरेकर, मंगेश गुरव, रमाकांत नर, राजेंद्र महागावकर, संजय बने, विलास मेहकर, किशोर मुंडे, आकाश पाटील, अमोल पारधी, राजेश जाधव, कुणाल गावडे, अक्षता राणे, अमृता मोरे, कामिनी दळवी, उमा रमेंडकर, उर्मिला चव्हाण, पौर्णिमा भूमे, श्रद्धय सागवेकर, प्रतिभा ताम्हणकर, रेश्मा गोडके, मृणाली नाईक, दक्षा घोसाळकर, ज्योती गोसावी, मांडवकर ताई यांच्यासह जवळपास ६०० पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आमदार आशिष शेलार आणि गटनेते प्रविण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना दरेकर म्हणाले की, मी जेव्हा पक्ष सोडून भाजपात प्रवेश केला तेव्हा कधीही मनसे, राज ठाकरेंवर टीका केली नाही. हे सर्व कार्यकर्ते माझ्या तालमीत तयार झालेले आहेत. पण मी त्यांना कधीही भाजपात या असे म्हटले नाही. तुम्ही ज्या पक्षात आलात त्या पक्षात समाधान, आनंद मिळेल हा विश्वास देतो. मला विधनापरिषदेवर आमदार करा असे मी पक्षाच्या नेतृत्वाला कधीच म्हटले नाही. परंतु पक्षाने, नेतृत्वाने माझ्या कामाची दखल घेऊन आमदार, विरोधी पक्षनेता, गटनेता केले. ही पक्षाची सर्वसमावेशक भुमिका आहे. सर्व प्रथम राष्ट्रहित त्यानंतर पक्ष व नंतर स्वतः हा भाजपा आणि इतर पक्षातील फरक असल्याचे दरेकर म्हणाले. तसेच जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात जे एसआरएसह प्रलंबित प्रश्न आहेत ते निश्चित मार्गी लावू. आपले उत्तर मुंबईचे उमेदवार पियुष गोयल यांनी नानावटी, लिलावती, रिलायन्सच्या धर्तीवर उपनगरात सुसज्ज असे रुग्णालय उभारणार असल्याची ग्वाही दिल्याचेही दरेकरांनी सांगितले.

दरेकर पुढे म्हणाले की, राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार उत्तम कामं करत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे लोकप्रिय नेते नेतृत्व करताहेत त्यामुळे सर्व पक्षातील लोकांना भाजपात गेले पाहिजे असे वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदींविषयी वेगळा विश्वास जनतेत आहे. त्यामुळे पक्षाचे कार्य करा तुम्हाला मान, सन्मान देण्याचे निश्चितपणे कामं होईल. प्रविण मर्गज हे सहकारात माझ्यासोबत कामं करतात. त्यांनी महिलांसाठी किमान १० संस्था स्थापन कराव्यात. त्या संस्थांद्वारे रोजगार निर्माण करा, असे आवाहनही दरेकरांनी केले. तसेच आगामी निवडणुकीत जोगेश्वरी विधानसभेवर भाजपाचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

तर भाजपा मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार म्हणाले की, उद्धव ठाकरे अब की बार भाजपा तडीपार अशी फुसकी जिकडे जातील तिकडे सोडताहेत. पण रविंद्र वायकर एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत गेले, प्रविण मर्गज आमच्याकडे आले. म्हणजे जोगेश्वरीतून अब की बार उबाठा सेना तडीपार असे म्हणावे लागेल. भाजपा हा खऱ्या लोकशाही मूल्यांवर चालणारा सर्वसामान्य लोकांचा पक्ष आहे. हा कुणाचा पारिवारिक पक्ष नाही. या पक्षाचा मालक कार्यकर्ता आहे. कालपासून तुम्ही खासगी पक्षात होता आजपासून तुम्ही सार्वजनिक पक्षात आला आहात, असा टोलाही शेलार यांनी लगावला.

शेलार पुढे म्हणाले की, भाजपा हा एकमेव राष्ट्रीय पक्ष असा आहे ज्याचा जन्म मुंबईत झाला. छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारा पक्ष आहे. शिवाजी महाराजांच्या नावाने गळे काढायचे, घोषणा द्यायच्या, मतं मागायची याशिवाय उबाठा सेनेने काहीच केले नाही. आमच्या शिवरायांच्या आरामाराचे सैन्य व त्यांच्या पराक्रमाची अष्टमुद्रा ही भारतीय संरक्षण दलाच्या झेंड्यावर कुणी आणली असेल तर ती पंतप्रधान मोदींनी. आग्रा येथे शिवरायांचे राष्ट्रीय संग्रहालय हे तेथील भाजपाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या बगलबच्यानी २५ वर्ष मुंबईवर राज्य केले. त्यावेळी मुंबईला बॉंबे म्हटले जायचे. संसदेत बॉंबेचे मुंबई तत्कालीन भाजपा खासदार राम नाईक यांनी केल्याची आठवणही शेलार यांनी करून दिली.

आपला लढा महाविकास आघाडी आणि उद्धव ठाकरेंबरोबरच आहे. ही अभद्र युती महाविकास आघाडी आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठी माणसाच्या छातीवर काँग्रेसच्या मुरारजी देसाई, स. का. पाटील यांच्या सरकारने गोळ्या घातल्या. त्या काँग्रेससोबत उद्धव ठाकरेंच्या पक्षाने हातमिळवणी केली. मराठी माणसाच्या खुणाच्या रक्ताने रंगलेला काँग्रेसचा हात उद्धव ठाकरेंनी हातात मिळवला आहे याचा अर्थ संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील मराठी माणसाच्या रक्ताचे ठसे उद्धव ठाकरेंच्या हातालाही लागले असल्याचा घणाघात शेलार यांनी केला. पंतप्रधान मोदींचे स्वप्न भारताला विकसित करण्याचे आहे. तुमच्या सर्वांना उचित न्याय, सन्मान देणे ही माझी जबाबदारी आहे, असा विश्वासही शेलार यांनी दिला.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष मेढेकर, उपजिल्हा अध्यक्ष दीपक खानविलकर, जोगेश्वरी-पूर्व विधानसभा निवडणूक प्रमुख उज्वला मोडक, मंडळ अध्यक्ष आनंद परब, माजी नगरसेवक मुरजी पटेल, सुभाष दरेकर आदी उपस्थित होते.

# राणीवाहेगावच्या जि.प. शाळेला १११ पुस्तकांची भेट

**परतूर । प्रतिनिधी**

राणीवाहेगाव (ता.परतूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वाचनालयाला परभणी येथील एचएआरसी संस्थेतर्फे एकशे अकरा पुस्तकांची आनंदी वाचन पेटी भेट देण्यात आली. एचएआरसी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी राणीवाहेगाव शाळेतील वाचनालयाला भेट दिली.त्या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर तयार केलेल्या चिकट बुकांचे त्यांनी कौतुक केले.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षर आनंद वाचन संस्कार चळवळीचे परभणी जिल्हा समन्वयक प्रकाश डुबे यांनी केले. यावेळी त्यांनी अक्षर आनंद पचन संस्कार केंद्र राबवीत असलेल्या पाच कलमी कार्यक्रमाबद्दल माहिती दिली, तसेच अक्षर आनंद ई-बाल मासिकासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन त्यांनी केले.एचएआरसी संस्थेचे ध्येय व कार्याविषयी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक यांनी दिली. ड.चंद्रकांत राजूरे व राजेंद्र खापरे व राऊतवाड यांनी मुलांना वाचनाचे महत्व सांगितले. आणि शाळेतील विद्यार्थी कु.हर्षदा वाव्हळ, आरती आकात, हर्ष मानवतकर, भाग्यश्री आकात, रूद्र मानवतकर, शिवाणी कळसाईतकर, शैलेश बोबडे यांनी वाचलेल्या पुस्तकावर विवेचन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती नरसाबाई करवा यांनी आभार मानले या कार्यक्रमास पालक वर्ग म्हणून रमेश मानवतकर,धिरज वाव्हळ, राधाकिसन बोबडे, विष्णू मखमले, अरविंद सराफ,श्याम यादव ,सचिन वाव्हळ, हरीभाऊ खंदारे यांची उपस्थिती होती.शाळेच्या शिक्षिका अनिता तांगडे व कल्पना वानरे मॅडम यांनी कार्यक्रमास सहकार्य केले.

# कौसडी येथे इफ्तार पार्टीच्या माध्यमातून एकतेचा संदेश

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील माजी सरपंच शेख सलीम यांच्या निवासस्थान परिसरात दिनांक ७ एप्रिल रविवार रोजी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या इफ्तार पार्टीच्या माध्यमातून हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश देण्यात आला.



सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना हे अंतिम टप्प्यात आला असून या रमजान महिन्यामध्ये मुस्लिम बांधव रोजा (उपवास) ठेवतात तसेच अल्लाहाची प्रार्थना करतात व कुराआण ग्रंथाची पठण करतात. मुस्लिम समाजातील नागरिक महिला लहान मुले तप-तपत्या उन्हात १३ ते १४ तास रोजा (उपवास) ठेवून महिनाभर अल्लाह ईश्वराची प्रार्थना करत असतात.

माजी सरपंच शेख सलीम यांनी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीमध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून विक्की बोर्डीकर हे होते तर माजी सरपंच यशवंतराव देशमुख माजी पं.स.सदस्य आयुब खान पठाण माजी सरपंच लिंबाजीराव इखे माझी चेअरमन तातेराव बारवकर रघुनाथ कळासने, चंद्रकांत कुलकर्णी कोक चे सरपंच वहीद खान पठाण मंचकराव देशमुख, हरिभाऊ खैरे ग्रा.पं.सदस्य बालासाहेब बहिरट माऊली बारवकर, शिवाजी लगड, दत्ता काळे, समीर पठाण, अन्वर पटेल यांच्यासह हिंदू मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते हे इफ्तार पार्टी यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शेख तज्जमुल, शेख जुनेद, शेख समीर, शेख मसरूफ, शेख रहीम, शेख फारुख, यांनी परिश्रम घेतले होते.

# बैल जोडी पळवणाऱ्या चोरट्यास पोलिसांनी पकडले



**परभणी । प्रतिनिधी**

०५ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० ते ८.०० सुमारास चिकलठाणा परिसरातील शेतकरी हकीम खान आशरफ खान पठाण यांच्या शेतातील हरण्या रंगाचे बैल जोडी अंदाजे किंमत ७० हजार रुपये असणारी शेतीतील आखाड्यावर बांधले व जेवण करण्यासाठी घरी निघून गेले व त्यानंतर थोड्या वेळाने बैलांना वैरण टाकण्यासाठी शेतीतील आखाड्यावर आले असता तिथे बैल जोडी दिसला नाही म्हणून त्यांनी त्यांच्या नातेवाईकास व पोलिसात फोन करून आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला असता खूपसा पाठीच्या जवळ रोडवर साईबाबा मंदिराच्या बाजूस परमेश्वर लक्ष्मण शिंदे राहणार देवला पुनर्वसन अशा व्यक्तीला बैलजोडी घेऊन जात असता पोलीस उपनिरीक्षक देशमुख आणि पोलीस हवालदार सूर्यवंशी व कांगणे यांनी ताब्यात घेतले पोलीस निरीक्षक बोरसे साहेबांच्या आदेशानुसार सदरील व्यक्तीवर गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस हवालदार सूर्यवंशी यांच्याकडे देण्यात आला आहे..

# शिर्डीतून माझ्या उमेदवारीला राधाकृष्ण विखे पाटील यांचा विरोध-रामदास आठवले

**अहमदनगर**-माझ्या शांत स्वभावाचा फायदा सर्वजणच घेतात. जागा वाटपावरून मीही वाद घातला असता; पण तसे केले नाही. शिर्डीची जागा आरपीआय पक्षाला देऊ नये, रामदास आठवले हे प्रबळ उमेदवार नाहीत, असे पत्र राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना दिले होते. त्यामुळे मला उमेदवारी मिळाली नाही, असा आरोप केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केला आहे.

दरम्यान शिर्डीची जागा मला मिळाली नाही. राधाकृष्ण विखे-पाटलांनी मला शिर्डीतून तिकीट मिळू नये, यासाठी पत्र लिहिले होते, असा गौप्यस्फोट आठवलेंनी केला आहे. एका वृत्तपत्राशी बोलताना त्यांनी विखे पाटील यांच्यावर आरोप केला आहे.रामदास आठवले म्हणाले की, निवडणूकपूर्व सर्वेक्षणाचे दाखले देत भाजपने मिंधे गटाच्या अनेक नेत्यांच्या उमेदवारीला प्रखर विरोध केला. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतून कुणाला उमेदवारी द्यावी, याच्या सूचना भाजप नेतृत्वाने केल्या. जिंकून येणाऱ्या उमेदवारालाच उमेदवारी, असाच निकष ठेवण्यात आला. हेच लक्षात घेऊन, शिर्डीसाठी रामदास आठवले प्रबळ उमेदवार नसल्याचे कारण पुढे करून विखे-पाटील यांनी माझ्या उमेदवारीला तीव्र विरोध करत आरपीआयला ही जागा देऊ नये, अशी भूमिका फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मांडली, असे आठवले यांनी सांगितले.

# संगमनेरात ९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी अखेर जेरबंद

**संगमनेर । प्रतिनिधी**

संगमनेरात ९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी अखेर जेरबंद संगमनेर तालुक्यात चोरीच्या गुन्ह्यातील ९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी प्रशांत बाळासाहेब खरात (वय २८, कौठे बुद्रुक, ता. संगमनेर) याला संगमनेर शहर पोलिसांनी शनिवारी (६ मार्च) मोठ्या शिताफीने पकडून गजाआड केले. प्रशांत खरात याच्यावर २०१४ मध्ये संगमनेर शहर पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल आहे. तेव्हापासून तो फरार होता. आपले अस्तित्व लपून राहणार खरात ९ वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. पोलिस निरीक्षक भगवान मथुरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रमेश पाटील, कॉन्स्टेबल हरिशचंद्र बांडे, रोहिदास शिरसाठ, आत्माराम पवार, अमित कुऱ्हे व गुन्हे शाखेच्या पोलिस अधिकाऱ्यांनी त्याची माहिती काढत घारगांव पोलिस स्टेशन हद्दीतुन शर्तीचे प्रयत्न करुन त्याला अटक केली. खरातला न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असून अधिक तपास सुरु आहे.







रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए ) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मान. दिपकभाऊ निकाळजे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांची घेतली आज भेट तेव्हा महिला प्रदेश अध्यक्षा सुनिताताई चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब पवार , प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ, प्रदेश संघटक कैलास जोगदंड , प्रदेश सचिव अशोक ससाणे , कार्यालय प्रमुख तानाजी मिसळे, नितीन जाधव ,देवेद्र मोहन,चद्रशेखर सकपाळे,प्रशात केळशीकर,नितीन जाधव ,ठाणे जिल्हा महासचिव तथा अकोला लोकसभा प्रभारी सचिन कोकणे, प्रशांत तोरणे , राजू कटारनवरे, प्रदीप सोनवणे, ,सचिन खरात , आकाश घोडके , शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते

# शिवसेना शिंदे गटाची दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारांची यादीही लांबणीवर पडली

**मुंबई । प्रतिनिधी**

महायुतीमध्ये भाजपच्या दादागिरीपुढे हतबल झालेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्या टप्प्यातील आपल्या उमेदवारांचा निर्णय दोन तीन दिवसांनंतर होईल,असे आज मुंबईतील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर जाहीर केले. त्यामुळे शिवसेना शिंदे गटाच्या इच्छुक उमेदवारांना आणखी काही दिवस वाट पहावी लागेल हे स्पष्ट झाले.



मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या वर्षा निवासस्थानी पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत उमेदवारांच्या नावांबद्दल काही निर्णय होईल अशी अपेक्षा होती.मात्र निवडणुकीच्या काळात पदाधिकाऱ्यांच्या बैठका होतच असतात. आजची बैठकीही निवडणुकीच्या रणनितीवर चर्चा झाली,असे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी बैठकीत ठोस निर्णय झाला नसल्याचे संकेत दिले.विदर्भात महायुतीसाठी अत्यंत उत्साहवर्धक वातावरण आहे. मी स्वतः विदर्भात जाऊन हा अनुभव घेतला आहे.त्यामुळे विदर्भातील सर्व जागा महायुतीचे उमेदवार मोठ्या मत फरकाने जिंकतील हे निश्चित आहे,असे शिंदे म्हणाले.याप्रसंगी शिंदे यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटावर टीका केली.आम्ही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन काम करतो. रस्त्यावर उतरून, लोकांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेतो. उंटावरून शेळ्या हाकत नाही. त्यांच्याकडे (उद्धव ठाकरे गट) ना अजेंडा आहे, ना झेंडा.त्यांनी दुसऱ्याच्या घरात डोकावून पाहण्यापेक्षा आपल्याकडे काय कुठे जळत आहे हे बघावे,असा टोला शिंदे यांना हाणला.

दरम्यान, शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी रत्नागिरी-सिंधुदूर्ग, नाशीक, पालघर आणि संभाजीनगर या जागांसाठी आम्ही आजही आग्रही आहोत,असे सांगत या जागांवरून महायुतीमध्ये तिढा कायम आहे, याचे स्पष्ट संकेत दिले.

# मानवी रांगोळीतून मतदार जनजागृतीचा संदेश

## तीन शाळांच्या २५०० हजार विद्यार्थ्यांचा सहभाग


**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासन अनेक उपक्रम राबवित आहे. स्वीप मोहिमेंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत सायकल रॅली, मिनी मॅरेथॉन, रिल्स, पोस्टर्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून सोमवारी शालेय विद्यार्थ्यांनी साकारलेल्या मानवी रांगोळीतून मतदार जनजागृतीचा संदेश देण्यात आला.

पोलिस मुख्यालय येथे आयोजित या कार्यक्रमात मातोश्री विद्यालय, भवनजीभाई चव्हान महाविद्यालय आणि विद्याविहार विद्यालयाच्या जवळपास २५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, शिक्षणाधिकारी (माध्य.) निकिता ठाकरे, आश्विनी सोनवणे (प्राथ.), उपशिक्षणाधिकारी विशाल देशमुख, निवास कांबळे यांच्यासह कलाअध्यापक संघ व इतर शिक्षक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, विद्यार्थी हे उज्वल भारताचे भविष्य आहे. त्यामुळे त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे पालक, आजुबाजूचे शेजारी, नातेवाईक व इतर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जगात भारत हा सर्वात मोठा लोकशाही देश आहे. त्यामुळे मतदान हा लोकशाहीचा केंद्रबिंदू असून मतदान करणे केवळ हक्कच नाही तर आपले प्रथम कर्तव्य आहे. आपले व देशाचे भविष्य घडविण्यासाठी प्रत्येकाने मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. येथे जमलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने किमान २० लोकांना मतदानाबाबत जागृत करावे. येत्या १९ एप्रिल रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करण्याचा सर्वांना आग्रह करा. विशेष म्हणजे कोणत्याही प्रलोभनाला किंवा आमिषाला बळी न पडता व स्वत:चे मत न विकता निर्भिडपणे मतदान करा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले.

**विद्यार्थ्यांनी 'मतदार दूत' बना : मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन**




यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, भारतीय लोकशाही सर्वात मोठी असल्यामुळे प्रत्येकाने मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. जबाबदार नागरिक म्हणून मतदानाच्या प्रक्रियेमध्ये आपण सामील झालोच पाहिजे. गत निवडणुकीत ६४ टक्के मतदान झाले होते, त्यातही चंद्रपूर शहरात केवळ ५३ टक्के लोकांनीच मतदान केले. शहरात सर्व सोयीसुविधा असताना कमी मतदान होणे हे दुर्दैवी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनो तुम्ही मतदार दूत बनून नागरिकांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करा, असे आवाहन श्री. जॉन्सन यांनी केले.

विद्यार्थीनींनीही व्यक्त केले मनोगत : मातोश्री विद्यालयाची इयत्ता १० वी ची विद्यार्थीनी मानसी धपाळे म्हणाली, निवडणुका लोकशाहीचा उत्सव आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती होऊ शकते. हा एक चांगला उपक्रम आहे. निवडणुकीत तरुणांचा सहभाग असणे आवश्यक आहे. प्रशासनाने मतदानाची सुट्टी दिली असली तरी ही सुट्टी फिरण्याकरीता नाही तर आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आहे. त्यामुळे सर्व कामे बाजुला सारून नागरिकांनी मतदानाला प्राधान्य द्यावे.

तर भवनजीभाई चव्हाण विद्यालयाची इयत्ता ८ वी ची विद्यार्थीनी अमृणी कवरासे म्हणाली, मतदान व्यवस्था हा आपला कणा आहे. मतदान हाच खरा लोकशाहीचा आधार असून मतदानाचा मुलभूत अधिकारी आपल्याला संविधानाने दिला आहे. देशात लोकशाहीचा जागर आणि संविधानाचा आदर करणे आपले कर्तव्य आहे, असे तिने सांगितले.

यावेळी मानसी धपाळे हिने मतदार संकल्प पत्राचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपशिक्षणाधिकारी निवास कांबळे यांनी केले. संचालन अविनाश जुमडे यांनी तर आभार धनपाल फटींग यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

## विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन निबंध व चित्र १२ एप्रिलपर्यंत सादर करावेत

**गडचिरोली । प्रतिनिधी**

भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणी करण्याबरोबरच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मौलिक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला, विशेषतः शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व त्यांच्या कार्याशी संबंधित कार्यक्रमाचे आयोजन गोंडवाना विद्यापीठात करण्यात येत आहे.या स्पर्धांमध्ये विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा. असे आवाहन गोंडवाना विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. सदर स्पर्धा ही निशुल्क असून निबंध व चित्र १२ एप्रिल २०२४ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सादर करावेत.

निबंध स्पर्धेचे विषय व नियमावली:

१).डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारीता, २).डॉ. बाबासाहेब आंबेडकर: अर्थतज्ञ, ३).डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी धोरण, ४). भारतीय लोकशाहीमध्ये संविधानाचे योगदान या चार विषयांवर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

निबधांची शब्द मर्यादा २ हजार ते ३ हजार शब्द असावेत. निबधांचे माध्यम मराठी,हिंदी किंवा इंग्रजी या भाषेत असावे. लिखीत निबंध ऑनलाईन किंवा ऑफलाईन स्वरुपात सादर करावेत. ऑफलाईन निबंध लिफाफ्यामध्ये सादर करावेत. लिफाफ्यावर संपुर्ण नाव, संपर्क क्रमांक आणि विभाग नमुद करावा. निबंध ऑनलाईन पदधतीने सादर करतांना स्पर्धकाने स्वत:चे संपुर्ण नाव, संपर्क क्रमांक आणि विभाग स्वतंत्र पानावर नमुद करावा. तसेच सदर निबंध essay.guggmail.com या ई-मेलवर सादर करावेत. निबंध सुवाच्य, सुस्पष्ट असावे किंवा टंकलिखीत असावे. निबंध स्पर्धेकरीता नि युक्त केलेल्या परीक्षक समितीने दिलेला निर्णय स्पर्धकांना बंधनकारक राहील.

चित्रकला स्पर्धेचे विषय व नियमावली:

१).चवदार तळे सत्याग्रह, २).काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, ३).दीक्षाभूमी नागपूर, ४).डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सर्व महाविद्यालयातील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होता येईल. प्रत्येक स्पर्धकाला चार पैकी एका विषयावर चित्र काढावे लागेल. आवश्यक असल्यास स्पर्धकाला २२ इंच व १५ इंच इतक्या आकाराच्या रेखाचित्र कागदावर चित्र काढावे लागेल. स्पर्धकांना चित्र काढण्यासाठी सदर कागद विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठाकडून पुरविण्यात येईल. काढण्यात येणारे चित्र तैल, पाणी, पोस्टर किंवा पेस्ट रंगांमध्ये काढता येईल. रंगकामाकरीता आवश्यक असलेले साहित्य जसे, कुंचले, रंग, पेन्सिल स्पर्धकास स्वतः आणावे लागेल. स्पर्धकांनी आपले संपूर्ण नाव, संपर्क क्रमांक व विभाग चित्राच्या मागे नमूद करावे.

**पारितोषिकेचे स्वरुप:**निबंध व चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त स्पर्धकांना पारितोषिक देण्यात येणार आहे. प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धकास रुपये २ हजार व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक प्राप्त स्पर्धकास रुपये १ हजार व प्रमाणपत्र तसेच तृतीय क्रमांक प्राप्त स्पर्धकास रुपये ५०० व प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप राहील.

स्पर्धेच्या अधिक माहितीकरीता विद्यार्थी विकास विभागाच्या संचालक डॉ. प्रिया गेडाम ९०४९४७४११९ तसेच पी.जी.टी.डी., संगणक विभागाचे सहा. प्रा. डॉ. कृष्णा कारू ९४२३४०३१९३ यांच्याशी संपर्क साधावा.

# एकनाथ शिंदेंचा (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची धामाधुम सुरू आहे.पहिल्या टप्यात पूर्व विदर्भात ५ ठिकाणी निवडणूका होत असून १९ एप्रिलला मतदान पार पडणार आहे.चंद्रपूर - आर्णी लोकसभा क्षेत्रात निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून नुकतेच सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ भाजपचे नितीन गडकरी जिल्ह्यात येऊन गेले.सोमवारला पंतप्रधान नरेंद्र मोदी जिल्ह्यात येणार आहे तर कांग्रेस च्या प्रतिभा धानोरकर यांच्याही प्रचारार्थ बैठका होत असून प्रियंका गांधी सारखे बडे नेते जिल्ह्यात येणार आहे. २०१९ लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला केवळ चंद्रपूर - वणी आर्णी क्षेत्रातील एकमेव जागा या महाराष्ट्रात राखता आली त्यामुळे काँग्रेस पुढे ही जागा राखण्याची आव्हान आहे तर भाजप पुढे गड जिंकण्याचे आव्हान आहे .अशा स्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख संदीप गिऱ्हे प्रतिभा धानोरकर यांच्या प्रचारार्थ गाव गावात बैठका आयोजित करत आहे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवसेनेत मोठी इंकमिंग सुरू आहे .आज दि ७ रविवारी बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील पोंभुर्णा तालुक्यातील घाटकुळ येथील एकनाथ रावजी शिंदे यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गिऱ्हे यांच्या नेतृत्वात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात प्रवेश केला .यावेळी उपस्थितांना गोंडपिपरी शिवसेना तालुकाप्रमुख सुरज माडूरवार यांनी मार्गदर्शन करत महाविकास आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.यावेळी नगरसेवक गटनेता आशिष कावटवार,संदीप सुमटकर,पत्रुजी पाल,झाडे यांच्यासह शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

# तुम्ही पाठवलेले खासदार आरक्षण, महागाई,जीएसटी,दुध दरावर बोलले का?

**मंगळवेढा (वृत्तसंस्था) –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे बघून तुम्ही दहा वर्षात दोन खासदार पाठवले, त्यांनी संसदेत महागाई, जीएसटी, दूध दर, आरक्षण या प्रश्नावर एकदा तर बोलले का? असा सवाल आ. प्रणिती शिंदे यांनी तालुक्यातील तळसंगी ते बोलताना व्यक्त केला.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आज खोमनाळ, फटेवाडी, तळसंगी, डोणज, बोराळे, सिद्धापूर या भागाचा गाव भेट दौरा केला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी त्यांच्या समवेतकार्याध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार, धनश्री परिवाराचे शिवाजीराव काळुंगे, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष प्रा. येताळा भगत, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, अर्जुनराव पाटील, सुरेश कोळेकर, पांडुरंग चौगुले, जिल्हा उपप्रमुख तुकाराम भोजने, नंदा ओमने, क्रांती दत्तू, विष्णु शिंदे, शिवशंकर कवचाळे, ॲड. रविकरण कोळेकर, अजय आदाटे, मनोज माळी, बापू अवघडे, आयेशा शेख, सुनीता अवघडे, नाथा ऐवळे, अमोल मामाने, जयश्री कावचाळे, म्हांतेष पाटील, शिवाजी काळे, संजीव कवचाळे, सैफन शेख, चेतन पाटील, संगणा घोडके, कुमार धनवे, संदीप बाबर, प्रशांत सगेलकर, विष्णू भंडगे, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. शिंदे म्हणाल्या की, मोदी लाटेत खासदार झालेल्यांनी २०१४ ते १९ या काळात कोणतेही काम केले नाही. तरीही तुम्हाला खोटे बोलून तुमच्याकडून पुन्हा २०१९ ते २४ या कालावधीत मते घेतली. पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झाली. आणि आता पुन्हा खोटे बोलून मते मागण्यासाठी येत आहेत. परंतु आम्ही तुम्हाला वस्तुस्थिती सांगण्यासाठी आलो आहोत.तुमच्या प्रश्नासाठी महाविकास आघाडी सरकार पाठीशी राहील असा विश्वास देत सरकारने महागाई वाढवत तीनशे रुपयेला मिळणारा सिलेंडरमध्ये चौपट वाढ करून ठेवली. दुध दर कमी केला. त्यावर दिले जाणारे अनुदान अद्याप दिले नाही.शेतकऱ्यांनी भरलेल्या पिकाचा विमा अजून दिला नाही. शेतकऱ्याला मिळणाऱ्या खतावर जीएसटी लावली, पन्नास रुपयाच्या चपलीवर दीडशे रुपये जीएसटी लावणारे तुम्हाला दोन हजार रुपये मिळतात असे सांगून पुन्हा दिशाभूल करू लागल्याचे सांगितले. या दौऱ्यात ॲड. नंदकुमार पवार, प्रा. शिवाजीराव काळुंगे, प्रशांत साळे, पांडुरंग चौगुले, प्रा. येताळा भगत, ॲड. रविकिरण कोळेकर यांची भाषणे झाली.

# सह्याद्री इंग्लिश मीडियम येथे कराटेच्या कलर बेल्ट परीक्षा संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**

शाओलीयन वर्ल्ड मार्शल आर्ट शाखा सांगोला यांच्यामार्फत दिनांक ७ एप्रिल २०२४ रोजी सह्याद्री इंग्लिश मीडियम सांगोला येथे कराटेच्या कलर बेल्ट परीक्षा घेण्यात आल्या या परीक्षेला एकूण ५४ मुलांनी सहभाग घेतला होता या परीक्षेला बँकोक थायलंड व मलेशिया कोल लांमपूर येथील जागतिक स्तरावरील कराटे चा नवीन अभ्यासक्रम घेण्यात आला व नवीन व जुना अभ्यासक्रम यातील फरकक सांगण्यात आला विविध व्यायाम प्रकार कता कुमिते किक्स ब्लॉक चॉप नवीन कता प्रकारच्या टेक्निक नवीन कुमिते (फाइट ) प्रकाराच्या टेक्निक घेण्यात आल्या विविध जागतिक स्तरावरील कराटेचा अभ्यास आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जी.के वाघमारे सरानी जागतिक




स्तराचा अभ्यासक्रम घेतला यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यताप्राप्त राष्ट्रीय पंच निजेंद्र चौधरी श्रावणी वाघमारे मॅडम आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्री सुनील वाघमारे सर यांचे मार्गदर्शन लाभले या परीक्षा यशस्वी करण्याकरता मयंक स्वामी आशिष कोकरे आवेश फारुकी राधिका गारळे धनश्री एडगे आदींनी काम पाहिले.

# कोल्हापुर येथे डॉ अभिषेक खराडे पाटील यांना आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले

**परभणी । प्रतिनिधी**

सेलू येथील दैनिक सेवाशक्ती टाइम्स मराठी चे प्रतिनिधी श्री डॉ अभिषेक रमेशराव खराडे पाटील यांना एम के फाउंडेशन दिल्ली व दैनिक विशाल क्रांती यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यामध्ये अभिषेक रमेशराव खराडे यांना आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे संयोजन कमिटी यांच्याकडून पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले असून दिनांक ७ एप्रिल रोजी कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला आहे. यशवंत यशा हून उत्तम कोणतीही गोष्ट नाही आणि आपले कौतुक करण्यासाठी याहून चांगली संधी नाही. श्री डॉ अभिषेक रमेशराव खराडे पाटील राहणार सेलू आपण पत्रकारितेच्या माध्यमातून आपल्या लेखणीतून परखड लिखाण करून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली.

तसेच लेखणीतून अनेकांना न्याय देण्याचं अतिशय चांगले काम केलंय खरोखरच कौतुकास्पद आहे आपल्या कार्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. याची दखल घेऊन एम के फाउंडेशन दिल्ली व दैनिक विशाल क्रांती यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्याला आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करीत आहोत. खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा असे गौरविण्यात आले आहे या पुरस्कार सोहळ्याचे महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा ,आंध्र प्रदेश ,मध्य प्रदेश, दिल्ली येथील विविध क्षेत्रातील गुणवंतांना पुरस्कार देण्यात आला आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यार्तील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .